**प्रेसनोट** दि. 29/11/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून पिंपरी वाहतुक विभाग येथील महिला पोलीस शिपाई व ट्रॅफीक वॉर्डनवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे परिक्षेत्र** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | संत तुकाराम नगर पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 33 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | 1) श्रीमती वर्षा विठ्ठल कांबळे वय 35 वर्ष, महिला पोलीस शिपाई ब क्र 2211 नेमणूकः- पिंपरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड आयुक्तालय, राठी. लिंक रोड बौद्ध नगर, पिंपरी, पुणे **(वर्ग – 3)**<br>2) कृष्णा मच्छिंद्र गव्हाणे वय 28 वर्ष ट्रॅफिक वार्डन, राठी.आळंदी वडगांव रोड, राममंदिरच्या समोर, आळंदी. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 500/- (पाचशे रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 400/- (चारशे रूपये)** |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 400/- (चारशे रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 29/11/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 29/11/2025 |
| **ठिकाण** | KSB चौक, पिंपरी, पुणे येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, ला प्र वि,पुणे. (मो.क्र. 8425808058) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती निता मिसाळ, सहा. पोलीस आयुक्त, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9822214414) |

**थोडक्यात माहिती :-**

यातील तक्रारदार हे व्यवसायाने रिक्षा चालक असून त्यांच्याकडे स्वतःची रिक्षा आहे. तक्रारदार हे मोरवाडी चौक, KSB चौक, पिंपरी, कुदळवाडी या परिसरात रिक्षाचा व्यवसाय करतात. दि.17/11/25 रोजी तक्रारदार हे त्यांच्या रिक्षामधून जादा प्रवासी वाहतूक करीत असताना आलोसे महिला पोलीस शिपाई ब. क्र 2211/ श्रीमती वर्षा कांबळे व ट्राफिक वॉर्डन कृष्णा गव्हाणे यांनी तक्रारदाराची रिक्षा थांबवली तेव्हा श्रीमती वर्षा कांबळे व वार्डन गव्हाणे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या रिक्षावर जादा प्रवासी वाहतूक या सदराखाली कारवाई न करण्यासाठी 300 रुपये घेतले. दि 26/11/25 रोजी तक्रारदार KSB, पिंपरी चौकातून त्यांची रिक्षा घेऊन जात असताना म.पो.शि श्रीमती वर्षा कांबळे व ट्राफिक वार्डन गव्हाणे यांनी परत तक्रारदार यांची रिक्षा अडवली व त्यांनी तक्रारदारस तू नेहमीच या परिसरात जादा प्रवासी वाहतूक करीत असतो तूझ्या रिक्षावर जादा प्रवासी वाहतूक करत असल्याबाबतची कारवाई करायची नसल्यास प्रत्येक महिना 'आम्हाला हफ्ता म्हणून 500 रुपये द्यावे लागतील' असे बोलून 500 रुपयाच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि. 26/11/25 रोजी ला प्र वि पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. 29/11/2025 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता ट्रॅफिक वार्डन गव्हाणे यांनी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्या रिक्षावर जादा प्रवासी वाहतुक या सदराखाली कारवाई न करण्यासाठी स्वतःसाठी आणि महिला पोलीस शिपाई श्रीमती वर्षा कांबळे यांच्यासाठी त्यांच्या समक्ष तडजोडीअंती प्रत्येक महिण्यासाठी हफ्ता म्हणून 400 रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच तक्रारदार हे म.पो.शि.श्रीमती वर्षा कांबळे यांच्याकडे गेले असता त्यांनी ट्रॅफीक वार्डन गव्हाणे यांचेशीच बोलावे असे सुचविले.

त्यानंतर दि.29/11/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी ट्रॅफिक वॉर्डन कृष्णा गव्हाणे यांनी 13.05 वा. KSB चौक, पिंपरी येथे तक्रारदार यांचेकडून 400 रुपयाची लाच स्वीकारली असता आरोपी गव्हाणे यांना रंगेहात पकडण्यात आले त्यानंतर आरोपी लोकसेवक महिला हवालदार कांबळे यांनाही ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरूद्ध संत तुकाराम नगर पोलीस स्टेशन ठाण्यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे,**

यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) व्हॉट्स-अॅप क्रमांक - **9403781064 (पुणे)**, 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.